Publication: Punyanagari
Date: 9/2/2019
Page: 4
Column: 3

पुण्यनगरी
शनिवार
९ फेब्रुवारी २०१९

# अदानी वीज कंपनीतील कर्मचारी देणार रस्ता सुरक्षेचे धडे

मुंबई : अदानी वीज कंपनीचे ७००० हून अधिक कर्मचारी ४ ते १० फेब्रुवारी दरम्यान कंपनीतील व कंपनीबाहेरील ग्राहकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणार आहेत. मुंबईतील अदानी कर्मचारी वरिष्ठ आरटीओ अधिकाऱ्यांसोबत ३०वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करणार आहेत.

या अभियानाअंतर्गत रस्ता सुरक्षेचा संदेश सर्वत्र पसरवण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड अर्थात एईएमएलने सार्वजनिक ठिकाणी एक अपघातग्रस्त वाहन ठेवले आहे. यामधून रस्त्यांवरील अपघातांमुळे होणाऱ्या दुखापती व मृत्यूंबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाणार आहे. आरटीओमधील वरिष्ठ अधिकारी एईएमएल कार्यालयांना भेट देतील आणि रस्त्यांवरील अपघातांबाबत त्यांचे अनुभव सांगण्यासोबत वाहन चालवताना कोणती खबरदारी घेतली पाहिजे, याबाबत माहिती देतील. अदानी समूहाने आरटीओसोबत सहयोगाने काम करण्याचे ठरवले आहे. विविध व्हिज्युअल्स दाखवून जागरूकता निर्माण करणार दरवर्षीला रस्त्यातील अपघातांमुळे जवळपास ८० हजार लोकांचा मृत्यू होतो. जगात याचे प्रमाण १३ टक्के आहे. गाडी वेगाने चालवणे, वाहन चालवताना मोबाइलचा वापर करणे, मद्यपान करून गाडी चालवणे, सिग्नल तोडणे, सीटबेल्ट अथवा हेल्मेटचा वापर न करणे, या कारणांमुळे अपघात होतात. त्यामुळे एईएमएल आणि आरटीओ यांची टीम २४ कार्यालयांमध्ये कार्यशाळा आयोजन करणार आहे. या वेळी विविध ऑडिओ व्हिज्युअल्स दाखवून जागरूकता निर्माण करणार आहेत.